

दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे



वर्ष ६ ▪ अंक ५२ ▪ शनिवार २१ नोव्हेंबर २०२६ ▪ पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

सरकारी योजनांचा लाभ केवळ अनुदानापुरता मर्यादित ठेवू नका,

प्रशिक्षणातून रोजगाराच्या संधी निर्माण करा - डॉ. सुजय विखे



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

पुणतांबा– शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेऊन सर्वसामान्य कुटुंबांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याची गरज आहे. केवळ योजनांमधून मिळणारे अनुदान, साहित्य किंवा आर्थिक मदतीपुरते समाधान न मानता, शासनाच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या कौशल्य प्रशिक्षणाचा उपयोग करून रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करा. प्रशिक्षण घेतल्यानंतरही घरी बसून राहू नका. रोजगाराची मागणी करणाऱ्या प्रशिक्षित युवकांना काम मिळवून देण्याची जबाबदारी मी स्वीकारतो, अशी ग्वाही भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष तथा अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिली.

पुणतांबा येथे आयोजित महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या वतीने आयोजित कौशल्य वृद्धीकरण प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत ग्रामीण व शहरी भागातील नोंदणीकृत बांधकाम कामगारांना कौशल्य प्रशिक्षण प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमात ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार केवळ प्रमाणपत्रांचे वाटप करत नाही, तर योजनांचा प्रत्यक्ष लाभ लाभार्थ्यांच्या खात्यापर्यंत पोहोचविण्याचे काम करीत आहे. बांधकाम कामगारांना प्रमाणपत्रांचे ऑनलाइन वितरण पूर्ण झाल्यानंतर संबंधित कामगारांच्या खात्यावर प्रत्येकी चार हजार दोनशे रुपये जमा केले

जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली. मात्र, या आर्थिक मदतीबरोबरच कामगारांनी शासनाच्या माध्यमातून मिळणाऱ्या प्रशिक्षणाचा उपयोग करून स्वतःच्या पायावर उभे राहिले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. पुढे बोलताना म्हणाले शिर्डी आणि परिसरात मोठ्या प्रमाणावर औद्योगिक तसेच पायाभूत विकासाची कामे सुरू आहेत. एमआयडीसीच्या माध्यमातून उद्योग उभे राहत आहेत. शिर्डीमध्ये सुमारे साडेतीनशे कोटी रुपयांच्या खर्चातून विकासकामे होत असून, जवळपास पन्नास कोटी रुपये खर्चून क्रीडांगणाची उभारणी केली जात आहे. याशिवाय अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय, रस्ते आणि अन्य पायाभूत सुविधांची कामे सुरू आहेत. त्यामुळे स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत. मात्र, या संधींचा लाभ स्थानिक तरुणांनी घेतला पाहिजे.

महिला आणि पुरुषांनीही कुटुंबाच्या आर्थिक जबाबदारीत समान सहभाग घेतला पाहिजे. केवळ महिलांनी घरकाम करावे आणि पुरुषांनीच रोजगारासाठी बाहेर ■ पान ४ वर

पाणी बचत, स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा - आयुक्त यशवंत डांगे

लोकमान्य टिळक मित्र मंडळाचा खंडोबा-बानू विवाह सोहळ्याचा देखावा प्रथम; वाजतगाजत, सनईच्या सुरेल निनादात स्वीकारले पारितोषिक । ब्रिगेडियर राजीव चावला यांचा साडेतीन लाख देशी वृक्ष लागवडीबद्दल, तर योगासन स्पर्धेतील सुवर्णपदक विजेती दिया जासूद हिचा विशेष सत्कार



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने आयोजित सार्वजनिक श्री गणेशोत्सव देखावा स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव आणि आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते विजेत्या गणेश मंडळांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. टिळक रोड येथील लोकमान्य टिळक मित्र मंडळाने सादर केलेल्या खंडोबा-बानू विवाह सोहळ्याच्या देखाव्याला धार्मिक व आध्यात्मिक देखावे विभागात प्रथम क्रमांक मिळाला. मंडळाच्या सदस्यांनी वाजतगाजत आणि सनईच्या सुरेल निनादात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक स्वीकारले.

यावेळी ब्रिगेडियर राजीव चावला यांचा सीक्यूएव्ही परिसरात साडेतीन लाख देशी वृक्षांची लागवड केल्याबद्दल, तसेच राज्यस्तरीय योगासन स्पर्धेत सुवर्णपदक मिळविल्याबद्दल दिया जासूद हिचा विशेष सत्कार करण्यात आला.

महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, लोकमान्य टिळक यांनी गणेशोत्सव सुरू करून समाजप्रबोधनाचे प्रभावी व्यासपीठ निर्माण केले. गणेशोत्सवातील देखाव्यांच्या माध्यमातून सांस्कृतिक, धार्मिक आणि ऐतिहासिक परंपरेचा वारसा जपण्याचे काम होत आहे. कोणताही देखावा एका रात्रीत निर्माण होत नाही. त्यामागे मंडळांच्या सदस्यांचे मोठे कष्ट आणि नियोजन असते. या देखाव्यांतून समाजाला सुंदर विचार देण्याचे काम केले जाते.

व्यसनमुक्ती, पर्यावरण संवर्धन, समाजात घडणाऱ्या सत्य घटना, छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरवशाली इतिहास तसेच संत-महंतांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी गणेशोत्सवातील देखावे महत्त्वाची भूमिका बजावतात. आता गणेश मंडळांनी पुढाकार घेऊन समाजात पाणी बचतीबाबत जनजागृती करावी. आपल्यासमोर पाण्याचे मोठे संकट उभे आहे. प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून पाण्याची बचत करणे आवश्यक आहे.

आपण मोठ्या प्रमाणात झाडे नष्ट करून काँक्रीटची जंगले उभी करीत आहोत. त्यामुळे दिवसेंदिवस पावसाचे प्रमाण कमी होत चालले आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन ही काळाची गरज आहे. ब्रिगेडियर राजीव चावला यांनी सीक्यूएव्ही परिसरात साडेतीन लाख देशी वृक्षांची लागवड केली आहे. त्याचप्रमाणे उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनीही पालकमंत्री ग्रीन सिटी मोहिमेच्या माध्यमातून वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाचे ■ पान ४ वर

कचरा संकलनासाठी मनपाच्या ताफ्यात आणखी दहा घंटागाड्या दाखल

मोठ्या घंटागाड्यांमुळे कचरा संकलनाला गती; आमदार संग्राम जगताप यांच्याकडून पाहणी ओला व सुका कचरा वेगळा टाकण्याची सुविधा; नागरिकांनीही सहकार्य करण्याचे आवाहन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागांतर्गत शहरातील कचरा संकलनाचे काम एजन्सीमार्फत घंटागाड्यांच्या सहाय्याने केले जाते. या व्यवस्थेला अधिक गती मिळावी आणि कचरा संकलनाच्या कामात सुसूत्रता यावी, यासाठी एजन्सीच्या माध्यमातून आणखी दहा मोठ्या घंटागाड्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या घंटागाड्यांमुळे एकाच वेळी अधिक प्रमाणात कचरा संकलित करणे शक्य होणार असून, शहरातील कचरा लवकर उचलण्यास मदत होईल, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

नव्याने दाखल झालेल्या दहा घंटागाड्यांची आमदार संग्राम जगताप यांनी पाहणी केली. यावेळी त्यांनी कचरा संकलन व्यवस्थेची माहिती घेतली. या घंटागाड्यांमध्ये ओला आणि सुका



कचरा स्वतंत्रपणे टाकण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ■ पान ४ वर

चीनच्या भारतविरोधी कारवायांचा अमेरिकन अहवालातून पर्दाफाश

पाकिस्तानला लष्करी पाठबळ देत टू-फ्रंट वॉरचे षडयंत्र

नवी दिल्ली – भारताविरुद्ध सातत्याने कुरघोडी करणाऱ्या चीनचा खरा चेहरा अमेरिकन काँग्रेसच्या २०२६ च्या एका महत्त्वपूर्ण अहवालातून समोर आला आहे. भारताचा मुकाबला करण्यासाठी चीन पाकिस्तानला सातत्याने लष्करी पाठबळ देत असल्याचा खळबळजनक खुलासा या अहवालात करण्यात आला आहे. चीन आणि पाकिस्तानची ही वाढती लष्करी भागीदारी भारतासाठी एकाच वेळी दोन आघाड्यांवर युद्धाचा (टू-फ्रंट वॉर) धोका निर्माण करत असल्याचे अहवालात नमूद केले आहे.

ऑपरेशन सिंदूर दरम्यान चीनची छुपी मदत

मे २०२५ मध्ये पार पडलेल्या ऑपरेशन सिंदूर दरम्यान झालेल्या भारत-पाकिस्तान संघर्षाचा दाखला या अहवालात देण्यात आला आहे. या संघर्षाने स्पष्ट केले की, चीन थेट युद्धात न उतरताही संकटाच्या काळात पाकिस्तानला पडद्यामागून आणि छुप्या पद्धतीने लष्करी मदत पुरवू शकतो. त्यामुळे भविष्यात पाकिस्तानसोबत कोणताही लष्करी संघर्ष उद्भवल्यास चीनकडून पाकिस्तानला मिळणारी छुप्या पद्धतीची ताकद ही भारतासाठी चिंतेची बाब ठरत आहे.

भारताच्या वाढत्या ताकदीचा चीनला धसका

अमेरिकन अहवालात भारताची वाढती जागतिक ताकद आणि त्यावर मात करण्यासाठी चीनने आखलेली रणनीती यावर सखोल भाष्य करण्यात आले आहे. अहवालानुसार भारत हा जगातील त्या मोजक्या देशांपैकी एक आहे, ज्याच्याकडे मोठी लोकसंख्या, भक्कम अर्थव्यवस्था, लष्करी सामर्थ्य आणि मोक्याचे भौगोलिक स्थान आहे.

भारताची ही वाढती ताकद चीनच्या वर्चस्वाला थेट आव्हान देऊ शकते, याची जाणीव बीजिंगला आहे. भारताच्या विकासाला स्वतःसाठी धोका मानून, चीनकडून लष्करी, आर्थिक, सागरी आणि इतर विविध मार्गांनी भारतावर दबाव आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

गलवान संघर्षानंतर कायमचा अविश्वास

भारत आणि चीनमधील तणावाचे मुख्य कारण दोन्ही देशांमधील प्रलंबित सीमावाद आहे. २०२० मध्ये गलवान खोऱ्यात झालेली हिंसक झडप हा दोन्ही देशांच्या संबंधांमधील सर्वात मोठा टर्निंग पॉईंट ठरला. या घटनेनंतर भारताने कठोर आणि स्पष्ट भूमिका घेतली आहे की, सीमावाद बाजूला ठेवून चीनसोबत इतर क्षेत्रांतील संबंध सामान्य केले जाऊ शकत नाहीत.

सरस्वती विद्यालयात 'डेंग्यूमुक्त अहिल्यानगर' अभियानाचा १४ वा आठवडा उत्साहात साजरा

विद्यार्थ्यांनी नाटिकेतून दिला डेंग्यू प्रतिबंधाचा संदेश



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर शहर डेंग्यूमुक्त करण्याच्या उद्देशाने अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'डेंग्यूमुक्त अहिल्यानगर' साप्ताहिक उपक्रमाच्या १४ व्या आठवड्याचा कार्यक्रम केडगाव येथील सरस्वती प्राथमिक व माध्यमिक विद्या मंदिर, देवी रोड, प्रभाग क्रमांक १७ येथे उत्साहात पार पडला. या उपक्रमाला अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक संदीप भोर यांनी केले. त्यांनी शाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता, आरोग्य आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याचे महत्त्व सांगितले. डेंग्यूमुक्त शहरासाठी प्रत्येक नागरिकाने आपल्या घरापासून स्वच्छतेची सुरुवात करावी, असे मत त्यांनी व्यक्त केले.

यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी डेंग्यू प्रतिबंध या विषयावर आकर्षक जनजागृतीपर नाटिका सादर केली. या नाटिकेतून डासांची उत्पत्ती कशी होते, डेंग्यूचा प्रसार कसा रोखता येतो आणि नागरिकांनी कोणती काळजी घ्यावी, याचे सादरीकरण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमातून उपस्थितांना स्वच्छता आणि आरोग्याचा महत्त्वपूर्ण संदेश मिळाला.

महानगरपालिकेचे उपायुक्त हरिकल्याण येलगट्टे यांनी आपल्या ■ पान ४ वर

जनतेच्या विश्वासाची विकासकामांतून परतफेड करणार - आमदार दाते

पळशी विकासकामांसाठी ३२५ लाख रुपयांचा निधी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

पारनेर– पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या विशेष प्रयत्नातून पळशी गावासाठी मंजूर झालेल्या एकूण ३२५ लाख रुपयांच्या दोन महत्त्वपूर्ण विकासकामांचा भूमिपूजन सोहळा आमदार दाते यांच्या शुभहस्ते उत्साहात संपन्न झाला. यामध्ये पळशीवनकुटे रस्ता (प्रजिमा-२४) कि.मी. ३६/७०० येथे पोहोचमार्गासह लहान पुलाच्या बांधकामासाठी ३०० लाख रुपये, तर श्री विठ्ठल मंदिर देवस्थान पळशी येथे भक्तनिवास बांधण्यासाठी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. विधानसभा सदस्य झाल्यापासून पळशी गावात आजवर जवळपास सव्वापाच कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याचे आ. दातेंनी सांगितले.

यावेळी बोलताना आमदार दाते सर म्हणाले, श्री विठ्ठल मंदिर देवस्थान भक्तनिवासासाठी ग्रामस्थांनी मागणी केल्यानंतर अवघ्या सहा महिन्यांत संबंधित कामाचे भूमिपूजन होत आहे, ही त्या विठ्ठलाचीच कृपा आहे. यापुढील काळातही देवस्थानच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील राहणार आहोत. पळशीवनकुटे रस्त्यावरील पुलाची गरज आणि या भागातील नागरिकांची अडचण लक्षात घेऊन संधी मिळताच हे काम मार्गी लावल्याचे त्यांनी सांगितले.



आपल्या राजकीय वाटचालीविषयी बोलताना आमदार दाते सर यांनी कै. आ. वसंतराव झावरे (दादा) यांच्यासोबतच्या जुन्या सहकार्याच्या आठवणींना उजाळा दिला. ''मी साधारणतः २५ वर्षांचा असल्यापासून वसंतराव दादांसोबत काम केले आहे. त्यांच्या सर्वसमावेशक सामाजिक आणि राजकीय वाटचालीतून मला खूप काही शिकायला मिळाले. आज कुणी कितीही आपणच दादांचे वारसदार असल्याचे सांगत असले, तरी केवळ बोलून वारसदार होता येत नाही. दादांच्या विचारांशी प्रतारणा करणारा त्यांचा खरा वारसदार होऊच शकत नाही. त्यांच्या शिकवणुकीप्रमाणे त्यांचे विचार प्रत्यक्ष कृतीत उतरवून राजकीय वाटचाल करत मी माझ्या कृतीतून ते सिद्ध केले आहे.'' मतदारसंघातील विकासकामांबाबत आपली भूमिका स्पष्ट करताना आमदार दाते सर म्हणाले की, कोणत्या गावातून विधानसभा निवडणुकीत किती मतदान झाले, याचा विचार करून मी विकासकामे करत नाही. एखाद्या गावात मतदान कमी झाले असेल, तरी त्या गावातील नागरिकांच्या हिताला प्राधान्य देऊन काम करणे ही माझी भूमिका आहे. विरोध करणारेही योग्य भूमिका आणि कामाच्या माध्यमातून समर्थन देऊ लागतात यावर माझा विश्वास आहे. प्रत्येकाच्या भूमिका बदलत असतात. त्यामुळे राजकारणापेक्षा जनहिताला प्राधान्य देणे महत्त्वाचे आहे.

या भागातील विविध जाती-धर्मांतील नागरिकांशी गेल्या ४० वर्षांपासून आपले ऋणानुबंध आहेत. याचं गटातील कन्हेर गाव ही आपली जन्मभूमी असून पारनेर शहर ही आपली कर्मभूमी आहे. जन्मभूमी आणि कर्मभूमीचे ऋण ■ पान ४ वर

दै. आकर्षण निवडक

मेहेर इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या प्रा.अनुरिता झगडे यांना 'राज्यस्तरीय हिरकणी' पुरस्कार जाहीर

अहिल्यानगर- निमगाव वाघा येथील धर्मवीर ग्रामीण वाचनालयाच्या वतीने २४ नोव्हेंबर रोजी नवव्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात कर्तुत्ववान महिलांचा सन्मान सोहळा संपन्न होणार आहे.या कार्यक्रमात महिला अत्याचार विरोधी कार्य करणारे, महिला संरक्षण,महिलांचे समुपदेशन व अत्याचारा विरोधी लढण्यासाठी महिलांमध्ये अतुलनीय धाडस निर्माण करण्यासाठी प्रेरणादायी व्याख्याते मेहेर इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या प्रा.अनुरीता झगडे यांना राज्यस्तरीय हिरकणी पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.अशी माहिती धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाचे संस्थापक पै. नाना डोंगरे यांनी दिली आहे. या पुरस्कार सोहळ्याचे वितरण माजी जिल्हा परिषद सदस्या राणीताई लंके यांच्या हस्ते करण्यात येणार असून प्रमुख उपस्थितीत माजी जि.प.सदस्य माधवराव लामखडे, साहित्यिक सीए शंकर अंदानी,पुणे येथील लेखिका प्रा.अश्विनी काळे राहणार आहेत. प्रा.अनुरिता झगडे यांना विविध पुरस्कारांनी सन्मान करण्यात आले आहे.क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले गुणवंत शिक्षिका पुरस्कार,जागतिक महिला दिनानिमित्त लोकमत गौरव पुरस्कार,आदर्श मुख्याध्यापिका पुरस्कार असे विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.



न्याय रक्षा परिषदेच्या महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी अध्यक्षपदी नंदकिशोर भालारे यांची नियुक्ती

अहिल्यानगर - न्याय रक्षा परिषद या सामाजिक व जनहिताभिमुख संघटनेच्या महाराष्ट्र राज्य कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी नंदकिशोर उद्धवराव भालारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा संस्थापक प्रमुख ॲड. अंकित राज यांच्या मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती करण्यात आली. न्याय रक्षा परिषदेच्या माध्यमातून अन्यायग्रस्त नागरिकांना न्याय मिळवून देणे, सर्वसामान्यांच्या समस्या शासन व प्रशासनापर्यंत पोहोचविणे, तसेच शैक्षणिक, सामाजिक व जनहिताचे विविध उपक्रम राबविणे हे उद्दिष्ट आहे. नंदकिशोर भालारे हे सामाजिक क्षेत्रात सक्रिय असून वंचित, अन्यायग्रस्त आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने कार्यरत आहेत. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन तसेच संघटनेची ध्येयधोरणे राज्यभर प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने त्यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या नियुक्तीप्रसंगी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष योगेश कालूराम बाराथे, उपाध्यक्ष मच्छिंद्र निवृत्ती ढगे, महिला अध्यक्षा कमलताई मुसळे, महिला उपाध्यक्षा गौरी क्षीरसागर, महासचिव आशीर्वाद लोखंडे, ज्येष्ठ सल्लागार वसंत नाना आरोटे, प्रवक्ते अजय पवार, सचिव श्याम बबन पवार आदी उपस्थित होते. राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. अंकित राज यांनी भालारे यांचे अभिनंदन करून पुढील सामाजिक व संघटनात्मक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्यांच्या नियुक्तीमुळे महाराष्ट्रात परिषदेचे संघटन अधिक मजबूत होऊन अन्यायग्रस्त व वंचित नागरिकांच्या न्याय्य हक्कांसाठी प्रभावीपणे कार्य होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.



जामखेड व मोहा हद्दीतील अनधिकृत कला केंद्रांवर कारवाईची मागणी

अहिल्यानगर- जामखेड शहर तसेच मोहा हद्दीतील अनधिकृत कला केंद्रांविरोधात आणि तेथे सुरू असलेल्या कथित अवैध धंद्यांविरोधात अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघाचे अहिल्यानगर जिल्हा युवा जिल्हाध्यक्ष सचिन दत्तात्रय आजबे यांनी प्रशासनाकडे तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. वारंवार उपोषणे करूनही स्थानिक पातळीवर कोणतीही दखल किंवा कायदेशीर कारवाई होत नसल्याचा आरोप करत त्यांनी आता थेट नाशिक येथील विभागीय आयुक्तांकडे निवेदनाद्वारे कारवाईची मागणी केली असून, या निवेदनाची प्रत नाशिक परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक यांनाही माहितीस्तव रवाना करण्यात आली आहे. दि. १९ नोव्हेंबर २०२६ रोजी सादर करण्यात आलेल्या या निवेदनात नमूद केले आहे की, जामखेड शहरातील व मोहा हद्दीतील अनधिकृत कला केंद्र आणि तेथील अवैध प्रकारांविरोधात यापूर्वी तहसील कार्यालय तसेच जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अनेक वेळा उपोषणे करण्यात आली. मात्र, अद्याप न्याय मिळालेला नाही किंवा ठोस कायदेशीर कारवाई झाल्याचे दिसून आलेले नाही. विभागीय आयुक्तांनी या प्रकरणात तातडीने लक्ष घालून कठोर व कायदेशीर कारवाई करावी, अशी अपेक्षा निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे. कारवाई न झाल्यास येत्या ०७ डिसेंबर २०२६ रोजी विभागीय आयुक्त कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा सचिन आजबे यांनी दिला आहे. तसेच, या काळात स्वतःच्या कुटुंबास काही विपरीत प्रकार घडल्यास किंवा जीवितहानी झाल्यास त्यास संबंधित प्रशासन व कला केंद्र मालक जबाबदार राहतील, अशी नोंदही निवेदनात करण्यात आली आहे.

घोसपुरीत लोकवस्ती व शाळेजवळ नियमबाह्य पोल्ट्री शेड उभारणीस ग्रामस्थांचा विरोध

तहसीलदार व ग्रामपंचायत प्रशासकाचा आदेशाही धुडकावला; २ डिसेंबरपासून आमरण उपोषणाचा इशारा



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– नगर तालुक्यातील घोसपुरी येथे कोणत्याही शासकीय व पर्यावरणविषयक नियमांचे पालन न करता लोकवस्ती व जिल्हा परिषद शाळेजवळ १० हजार पक्षी क्षमतेचे पोल्ट्री शेड उभारले जात असल्याचा आरोप करत संजय उत्तम हांडोरे यांच्यासह ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. याविरोधात जिल्हाधिकारी, तहसीलदार, पोलीस अधीक्षक आणि घोसपुरी ग्रामपंचायत प्रशासनाला निवेदन देण्यात आले असून, मुदतीत कारवाई न झाल्यास २ डिसेंबर पासून ग्रामपंचायत कार्यालयाबाहेर आमरण उपोषण करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

निवेदनातील माहितीनुसार, मौजे घोसपुरी येथील शेतजमीन मिळकत गट क्रमांक ८६ मध्ये दोघांकडून पोल्ट्री शेड उभारले जात आहे. हे प्रस्तावित पोल्ट्री शेड १०० ते ३०० मीटरच्या आत असलेल्या लोकवस्तीपासून तसेच २०० मीटर अंतराच्या आत असलेल्या जिल्हा परिषद शाळेपासून जवळ उभारले जात असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या शाळेत सुमारे ५० ते ६० विद्यार्थी शिक्षण घेत असून, पोल्ट्री व्यवसाय सुरू झाल्यास दुर्गंधी, माश्या आणि किटकांचा प्रादुर्भाव होऊन विद्यार्थ्यांचे आणि नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

तसेच या जागेपासून जवळच विहिरी, बोअरवेल, शेततळे, ओढा, तलाव आणि नदी असे जलस्रोत तसेच शेजारील संत्रा बाग आहे. कोंबड्यांची विष्ठा, खाद्य आणि सांडपाण्यामुळे जल व जमीन प्रदूषण होऊन नागरिकांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण होऊ शकतो, असा मुद्दा अर्जात मांडण्यात आला आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या जानेवारी २०२२ मधील मार्गदर्शक तत्त्वांचे पालन न करता तसेच स्थानिक रहिवासी व शेजारील शेतकऱ्यांची संमती न घेता हे काम सुरु आहे. ९ ऑक्टोबर रोजी संबंधित विभागांकडे हरकत अर्ज दिल्यानंतरही काम वेगाने सुरू करण्यात आल्याचा आरोप करत संजय हांडोरे यांच्यासह विलास साळवे, मधुकर आबासाहेब शिर्के, दत्तात्रय आसाराम शिर्के, किरण साहेबराव हंडोरे, बापू निवृत्ती हंडोरे, संजय तुकाराम हंडोरे, मनोहर शंभू हंडोरे, संदीप मनोहर हंडोरे, अशोक सदाशिव हंडोरे, रोहन बापू हंडोरे, तुषार अशोक खोबरे, अशोक विठ्ठल खोबरे, बाबासाहेब आप्पा हंडोरे, जगन्नाथ शंकर हंडोरे, पोपट भगवंत हंडोरे, मधुकर भगवंत हंडोरे, यांच्यासह हंडोरे मळा व घोसपुरी ग्रामस्थांनी सह्या करून प्रशासनाकडे तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.

काम बंद करण्याचे लेखी आदेश धुडकावले या संदर्भात ग्रामस्थांनी ग्रामपंचायत प्रशासकाकडे तक्रार केल्या नंतर प्रशासकांनी १४ ऑक्टोबर रोजी स्थळ पाहणी करून संबंधितांना पोल्ट्री शेड उभारणीचे काम तात्काळ थांबविण्याचे लेखी आदेश दिले आहेत. अन्यथा आपणावर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ नुसार योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्यात येईल असा इशारा देण्यात आलेला आहे. या शिवाय ३० ऑक्टोबर रोजी तहसीलदार नगर यांच्या समोर झालेल्या सुनावणीच्या वेळीही तहसीलदार यांनी सदर काम त्वरित थांबविण्याचे आदेश दिले आहेत. तरीही हे दोन्ही आदेश धुडकावून काम सुरूच असल्याचे तक्रारदार संजय हंडोरे यांनी सांगितले. तसेच तक्रार केली म्हणून संबंधितांनी हंडोरे यांना मारहाणही केली होती. याबाबत नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हाही दाखल करण्यात आला असल्याचे हंडोरे यांनी सांगितले.

भाजपचे आमदार अमित गोरखे यांचे अहिल्यानगरमध्ये स्वागत



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– भारतीय जनता पक्षाचे विधान परिषदेचे आमदार तथा युवा नेते अमित गोरखे यांचे अहिल्यानगर शहरात आमदार संग्राम जगताप यांच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी सुभाष वाघमारे यांनी आमदार गोरखे यांचा सत्कार करून त्यांचे स्वागत केले. या भेटीदरम्यान मातंग समाजाच्या विविध सामाजिक, शैक्षणिक आणि विकासात्मक प्रश्नांवर त्यांच्याशी चर्चा करण्यात आली.

याप्रसंगी मातंग समाजाचे ज्येष्ठ नेते पंडित सर, वाघमारे, केतकी ग्रामपंचायतीचे उपसरपंच प्रकाश घोरपडे, युवा उद्योजक प्रदीप वावरे, ज्येष्ठ नेते सुनील उमाप आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना सुभाष वाघमारे म्हणाले की, भारतीय जनता पक्षातील युवा नेतृत्व म्हणून आमदार अमित गोरखे यांच्याकडे आशेने पाहिले जाते. त्यांनी सामाजिक, राजकीय आणि संघटनात्मक क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वातून स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन विकासाची वाटचाल करण्याची त्यांची भूमिका निश्चितच प्रेरणादायी आहे. युवकांचे प्रश्न, सामाजिक समरसता आणि वंचित घटकांच्या विकासासाठी त्यांचे नेतृत्व महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, या भेटीत मातंग समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. समाजातील शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी शहरात आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून प्रश्न सुटत आहे. मात्र आवश्यक असलेल्या उपाययोजना, समाजबांधवांना भेडसावणाऱ्या समस्या तसेच विविध मागण्यांकडे आमदार अमित गोरखे यांचे लक्ष वेधण्यात आले.

वेळीच निदान व योग्य उपचारांनी कॅन्सर पूर्ण बरा होऊ शकतो

कॅन्सर सर्जन डॉ. भूषण भळगट यांचे जनजागृतीपर व्याख्यान

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– आताच्या काळात कॅन्सरचे प्रमाण वाढले आहे. या आजाराचे निदान लवकर झाले पाहिजे. सामान्य पेशींचे खूप जास्त प्रमाणात विभाजन होणे म्हणजे कॅन्सर. कॅन्सर कोणालाही होऊ शकतो. यात दोन गोष्टी असतात. यातील एक गोष्ट म्हणजे जेनेटिक्स, जे आपल्या हातात नसते. दुसरी गोष्ट ज्या बाहेरून आपण ग्रहण केलेल्या असतात. यासाठी चांगला पोषक आहार घेणे गरजेचे आहे. वाढते प्रदूषण सिगारेट ओढण्या इतकेच घातक आहे. संपूर्ण सेंद्रिय अन्न आपण खाऊ शकत नाही. पण दारू, सिगारेट, तंबाखूला आपण स्वतः नियंत्रणात ठेवू शकतो. यावर पूर्ण नियंत्रण आणले तरी ३० टक्के कॅन्सर आपण थांबवू शकतो, असे मार्गदर्शन पुणे येथील कॅन्सर सर्जन डॉ. भूषण भळगट यांनी केले.



राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या पवित्र कर्मभूमीत आनंदधाम परिसरातील आनंद तीर्थ समवशरण येथे समर्पण चातुर्मास २०२६ संपन्न होत आहे. याठिकाणी शुक्रवारी पुणे येथील प्रसिद्ध कॅन्सर सर्जन डॉ. भूषण संजय भळगट यांचे कॅन्सर निदान व उपचार पद्धती या विषयावर जनजागृतीपर व्याख्यान झाले. उपाध्याय प्रवर पूज्य प्रविणऋषीजी म.सा., पूज्य तिर्थेशऋषीजी म.सा. यांच्या सान्निध्यात झालेल्या या व्याख्याना प्रसंगी आमदार संग्राम जगताप, धनश्री सुजय विखे पाटील, समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी, केमिस्ट असोसिएशनचे, नगरसेवक दत्ता गाडळकर, डॉ. संजय भळगट, डॉ. माधुरी भळगट, इंदौर येथील संतोषमामा जैन आदी उपस्थित होते. प्रारंभी समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा यांनी डॉ. भूषण भळगट यांचा परिचय करून देत स्वागत केले. चातुर्मास कमिटीच्यावतीने उपाध्यक्ष अनिल पोखरणा यांनी डॉ.भळगट यांचा सत्कार केला.

मार्गदर्शन करताना डॉ. भळगट म्हणाले, एखादा तंबाखू खात नसला तरी त्याला कॅन्सर होऊ शकतो, याला जेनेटिक्स कारणीभूत असतात. अनेकांना वाटते कॅन्सर पूर्ण बरा होऊ शकत नाही. पण पहिल्या किंवा दुसऱ्या स्टेजचे कॅन्सर पूर्ण बरे होऊ शकतात. याचा अर्थ पूर्ण उपचारानंतर जो दहा वर्षे कॅन्सर मुक्त राहतो, तो बरा झाला असे समजावे. कॅन्सरची पहिल्या स्टेजमध्ये एकाच अवयवात असते. दुसऱ्या स्टेज मध्ये तो थोडा पसरतो. चौथ्या स्टेजमध्ये तो इतर अवयवात पसरलेला असतो. महिलांमध्ये स्तनाच्या कॅन्सरचे प्रमाण जास्त असते. आपल्याकडे पुरूषांमध्ये तोंडाच्या कॅन्सरचे प्रमाण जास्त असते. हे कॅन्सर पहिल्या स्टेज मध्येच ओळखले जाऊ शकतात. महिलांमध्ये मासिक पाळी जितकी कमी असते तितके स्तनाच्या कॅन्सरचे प्रमाण कमी असते. आजकाल लग्नाला विलंब, मूल लवकर न होऊ देणे अशा कारणांमुळे स्तनाच्या कॅन्सरचे प्रमाण वाढले आहे. गर्भ पिशवीच्या मुखाचा कॅन्सर इन्फेक्शनमुळे होतो. त्यावर आज प्रभावी लसीकरण उपलब्ध आहे. लठ्ठपणा, मधुमेह असेल तर गर्भ पिशवीचा कॅन्सर होण्याची शक्यता अधिक असते. तोंडाचा कॅन्सर तंबाखू न खाणाऱ्यांनाही होतो. दात धारदार असतील, दातांचे इंम्प्लांट ढिले असतील तरीही तोंडाचा कॅन्सर होऊ शकतो.

स्तनाच्या कॅन्सरची गाठ खूप कडक असते, वेगाने वाढणारी असते. स्वतः परीक्षण करून सुद्धा लक्षणे ओळखता येतात. मॅमोग्राफी तपासणीही वेळोवेळी केली पाहिजे. गर्भ पिशवीच्या कॅन्सर संदर्भात मेनोपॉजनंतर वेळोवेळी तपासणी करून घ्यावी. तोंडाच्या कॅन्सरसाठी अल्सरची तपासणी तज्ज्ञांमार्फत करावी. तोंडातील पांढऱ्या चट्ट्यांकडे, बरी न होणारी जखम याकडेही लक्ष दिले पाहिजे. कोणतीही जखम, गाठ नसताना स्क्रिनिंग केली पाहिजे. २१ वर्षांपुढील महिलांनी पॅपस्मीयर तपासणी ठराविक अंतराने करावी. लसीकरण भविष्यातील इन्फेक्शनचा प्रतिकार करण्यासाठी असते. कॅन्सर झाल्यावर लस घेऊन उपयोग नसतो. याचे कोणतेही साईड इफेक्ट नसतात.

अहिल्यानगर शहरात बिबट्याचा मुक्तसंचार; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण!

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर शहरातील जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, पंकज कॉलनी, समता कॉलनी, तारकपूर, सिव्हिल हडको, प्रकाशपूर तसेच गंगा उद्यान रोड परिसरात गेल्या तीन दिवसांपासून बिबट्याचा मुक्तसंचार सुरू असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरातील दाट लोकवस्तीच्या भागात बिबट्याचा वावर असल्याने लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी तसेच सकाळी आणि रात्रीच्या वेळी ये-जा करणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

या गंभीर परिस्थितीची दखल घेत शिवप्रहार संघटनेने आक्रमक भूमिका घेत वनविभागाच्या अधिकाऱ्यांना निवेदन देऊन बिबट्याला तातडीने जेरबंद करण्याची मागणी केली आहे. संबंधित परिसर दाट लोकवस्तीचा असल्याने बिबट्या वस्तीत शिरल्यास एखादी दुर्दैवी घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे वनविभागाने या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने विशेष पथक तैनात करावे, परिसरात गस्त वाढवावी, अशी मागणी शिवप्रहार संघटनेने केली आहे.



तसेच मिस्किन मळ्यासमोर लोकवस्तीच्या शेजारी तातडीने पिंजरे आणि ट्रॅप कॅमेरे बसवावेत. बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवून त्याला सुरक्षितरीत्या पकडण्यासाठी वनविभागाने युद्धपातळीवर कार्यवाही करावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

वनविभागाने तातडीने ठोस पावले उचलून नागरिकांना भयमुक्त करावे, अन्यथा शिवप्रहार संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाला देण्यात आला आहे.

यावेळी निवेदन देताना शिवप्रहार संघटनेचे जिल्हाध्यक्ष विशाल म्हस्के यांच्यासमवेत प्रशांत सराईकर, अतुल चौधरी, अभिजीत भांडवलकर, विकी निक्रड, संदीप संसारे, राजेंद्र कर्डिले आदी उपस्थित होते.

आयएमएस अहिल्यानगरचा ऐतिहासिक विक्रम, टेस्ट ऑफ मॉम मध्ये १४ विद्यार्थ्यांची १५.५ लाख पॅकेजवर निवड

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (आयएमएस), अहिल्या नगर यांनी प्लेसमेंटमध्ये ऐतिहासिक यश मिळवले आहे. संस्थेच्या १४ विद्यार्थ्यांची नामांकित कंपनी टेस्ट ऑफ मॉम मध्ये रु. १५.५ लाख वार्षिक पॅकेज वर निवड झाली आहे. विद्यार्थ्यांची मेहनत, समर्पण आणि प्लेसमेंट सेलच्या सततच्या मार्गदर्शनामुळे हे यश मिळाले आहे.

श्रृष्टी काळे, ओंकार रणमळे, अंजली विठ्ठल रेडे, उपासना त्रिभुवन, वेद महेंद्र वसाळ, प्रथमेश रमेश गुज्जा, नेहा नारंग, प्रेरणा हेमंत गुगळे, समृद्धी मधुकर, दिशा अनिल गुंजाळ, तनया सुरेश कदम, कौशल श्रीकांत पवसे, वैष्णवी महादेव शिंदे, माहिन नाशिर शेख या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. संस्थेने सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले व त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

संपूर्ण प्लेसमेंट प्रक्रिया आयएमएस प्लेसमेंट सेलचे प्रा. सुरेश खन्ना यांच्या पुढाकाराने यशस्वीरित्या पार पडली. प्रभारी संचालिका डॉ. प्रणोती तेलोरे, उपसंचालक डॉ. विक्रम बार्नाबास, सल्लागार डॉ.एम.बी.मेहता यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व प्लेसमेंट सेलच्या प्रयत्नांचे कौतुक केले.

हभप समाधान महाराज शर्मा यांची ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिरास भेट

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– हभप समाधान महाराज शर्मा हे शिवमहापुराण कथेच्या निमित्ताने अहिल्यानगर येथे आलेले असल्याने त्यांनी शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिरास भेट देऊन श्री विशाल गणेशाचे दर्शन घेऊन महापूजा करून आरती केली .यावेळी महंत संगमनाथ महाराज ,उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे ,सचिव अशोकराव कानडे ,विश्वस्त पांडुरंग नन्नवरे ,चंद्रकांत फुलारी ,प्रा माणिकराव विधाते ,नितीन पुंड,हभप अमित महाराज धाडगे ,राजू एकाडे आदी उपस्थित होते .



यावेळी हभप समाधान महाराज शर्मा यांनी मंदिर परिसराची पाहणी करून भव्य गणेश मूर्तीची प्रशंसा केली. श्री विशाल गणेश मंदिर हे शहराचे श्रद्धास्थान असून येथे येऊन मनाला विलक्षण शांती लाभते. दर्शन घेतल्याने मानसिक समाधान मिळते आणि नव्या ऊर्जेची अनुभूती येते, असे त्यांनी सांगितले मंदिराविषयी माहिती उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे यांचेकडून जाणून घेतली .तसेच देवस्थानच्या वतीने हभप समाधान महाराज शर्मा यांचा सन्मान करण्यात आला सूत्रसंचालन नितीन पुंड तर प्रास्तविक सचिव अशोकराव कानडे यांनी केले तर आभार प्रा माणिकराव विधाते यांनी मानले

प्रभाग क्रमांक १७ मध्ये विकासकामांना गती; सुशांतनगरमध्ये डांबरीकरणाचा शुभारंभ!

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– शहरातील केडगाव परिसरातील प्रभाग क्रमांक १७ मध्ये विविध विकासकामांना गती मिळत असून, सुशांतनगर येथील बरमेचा यांच्या घरापासून ते पळसकर यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण पूर्ण करण्यात आले आहे. आमदार संग्राम जगताप यांच्या निधीतून तसेच नगरसेविका अश्विनी सुमित लोंढे यांच्या प्रयत्नांतून हे काम पूर्ण झाले. या रस्त्याचा शुभारंभ परिसरातील नागरिकांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी नगरसेवक मनोज कोतकर, नगरसेवक मयूर बांगरे, नगरसेविका कमलताई कोतकर, उद्योजक जालिंदर कोतकर, उद्योजक सुमित लोंढे, संचेती साहेब, सुनील नेहुल, माया पळसकर, सुनीता वाघ, सीमा रासने, अजित कोतकर, अनिकेत विधाते, तुषार चौधरी, मनी रासने, सुरेखा धनलगडे, नंदा नेहुल, प्रवीण पळसकर, राजेंद्र वाघ यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नगरसेवक मनोज कोतकर म्हणाले की, प्रभाग क्रमांक १७ मधील नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही आमची प्राथमिकता आहे. रस्ते, पाणी, वीज आणि स्वच्छता यांसारख्या प्रश्नांकडे सातत्याने लक्ष देऊन प्रभागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून विकासकामांसाठी निधी उपलब्ध होत असून, सर्व लोकप्रतिनिधी आणि नागरिकांच्या सहकार्याने प्रभागातील प्रलंबित प्रश्न चारी नगरसेव कांच्या माध्यमातून एकत्रितपणे मार्गी लावण्याचा आमचा प्रयत्न आहे. विकासकामे करताना नागरिकांच्या सूचनांनाही प्राधान्य दिले जाईल, असे ते म्हणाले.



नगरसेविका अश्विनी सुमित लोंढे म्हणाल्या की, सुशांतनगरमधील या रस्त्याची नागरिकांकडून अनेक दिवसांपासून मागणी होती. नागरिकांची गैरसोय लक्षात घेऊन आमदार जगताप यांच्या निधीतून या रस्त्याचे डांबरीकरण पूर्ण करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. नागरिकांना चांगले रस्ते आणि मूलभूत सुविधा मिळाव्यात, हाच आमचा उद्देश आहे. प्रभागातील प्रत्येक भागातील समस्या समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी मी सातत्याने प्रयत्न करणार आहे. नागरिकांनी दाखविलेल्या विश्वासाला विकासकामांच्या माध्यमातून न्याय देण्याचा माझा प्रामाणिक प्रयत्न राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा
फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)
The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

दै. आकर्षण निवडक

२१ दिवसांच्या योगाभ्यासातून स्थूलता निवारणासाठी योग वर्गाचे आयोजन

अहिल्यानगर - वाढती धावपळ, बदललेली जीवनशैली, बैठ्या कामाचे स्वरूप, अनियमित आहार आणि शारीरिक हालचालींचा अभाव यामुळे अनेकांना वजनवाढ व स्थूलतेच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. वाढत्या वजनामुळे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम लक्षात घेता नियमित योगाभ्यास, व्यायाम आणि शिस्तबद्ध जीवनशैलीचे महत्त्व अधोरेखित होत आहे. याच उद्देशाने योग विद्या धाम, अहिल्यानगर यांच्या वतीने स्थूलता निवारण योग वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे.

या विशेष योग वर्गामध्ये केवळ २१ दिवसांच्या योगाभ्यासातून १ ते ४ किलो वजन कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. योगासने, शारीरिक हालचाली, श्वसनाचे व्यायाम आणि नियमित सराव यांच्या माध्यमातून शरीराला सक्रिय ठेवण्याबरोबरच वजन नियंत्रणासाठी आवश्यक सवयी विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे. आधुनिक जीवनशैलीमुळे व्यायामासाठी वेळ न मिळणाऱ्या नागरिकांसाठी हा योग वर्ग उपयुक्त ठरणार आहे.

योग विद्या धामच्या वतीने आयोजित हा वर्ग १ डिसेंबरपासून दररोज सायंकाळी ४.३० ते ६ वाजेपर्यंत सुरू होणार असून, योग भवन, भिस्तबाग रोड, सावेडी येथे वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. या वर्गामध्ये सहभागी होणाऱ्यांना नियमित योगाभ्यासाची सवय लावून शरीर निरोगी व तंदुरुस्त ठेवण्यासाठी मार्गदर्शन केले जाणार आहे. वाढत्या वजनाकडे दुर्लक्ष न करता योग्य वेळी व्यायाम व योगाभ्यासाची सुरुवात करणे आवश्यक आहे. दैनंदिन जीवनात योगाचा समावेश केल्यास शारीरिक आरोग्यासोबत मानसिक स्वास्थ्य, उत्साह आणि सकारात्मकता टिकविण्यास मदत होते. त्यामुळे वजन नियंत्रणासाठी प्रयत्नशील असलेल्या नागरिकांनी या योग वर्गाचा लाभ घ्यावा, असे आवाहन योग विद्या धामच्या वतीने करण्यात आले आहे. या योग वर्गासंदर्भात अधिक माहिती व प्रवेशासाठी इच्छुकांनी श्री. वेसीकर सर (९४२३६७६०५९) किंवा श्री. शेखर एडके (९४२०३४७५७५) यांच्याशी संपर्क साधावा.

योग विद्या धामचे अध्यक्ष डॉ. सुंदर गोरे यांनी नागरिकांनी मोठ्या संख्येने या उपक्रमात सहभागी होऊन आरोग्यपूर्ण जीवनशैलीचा स्वीकार करावा, असे आवाहन केले आहे.

ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. राजेश कावरे



अहिल्यानगर- ग्रामीण भागातील साहित्यिक, कवी, लेखक आणि नवोदित प्रतिभावंतांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथील परिवार मंगल कार्यालयात मंगळवार, दि. २४ नोव्हेंबर रोजी नवव्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने हे संमेलन पार पडणार आहे. या संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. राजेश कावरे यांची निवड करण्यात आली आहे.संमेलनासाठी लेखक, नाशिक येथील चित्रपट निर्माता व दिग्दर्शक सुनील मोंढे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच प्रमुख व प्रेरक वक्ते आणि सामाजिक कार्यकर्ते अमोद नलगे यांचीही विशेष उपस्थिती लाभणार आहे. संमेलनाच्या माध्यमातून ग्रामीण साहित्य, सामाजिक जाणीव, सांस्कृतिक परंपरा आणि नव्या पिढीतील साहित्यिकांच्या अभिव्यक्तीला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. अशी माहिती संमेलनाचे संयोजक पै. नाना डोंगरे यांनी दिली.ग्रामीण भागात अनेक प्रतिभावंत लेखक, कवी आणि साहित्यिक आपल्या लेखणीच्या माध्यमातून समाजातील वास्तव, प्रश्न, संघर्ष, ग्रामीण संस्कृती आणि मानवी संवेदनांचे दर्शन घडवत असतात. मात्र, त्यांना आपले साहित्य सादर करण्यासाठी आणि विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी पुरेशी व्यासपीठे उपलब्ध होत नाहीत. ही उणीव भरून काढण्याबरोबरच ग्रामीण भागातील साहित्यिक चळवळीला व्यापक स्वरूप देण्याच्या हेतूने या संमेलनाची परंपरा जपली जात आहे. आयोजित करण्यात येणारे हे नववे संमेलन ग्रामीण साहित्यप्रेमींसाठी महत्त्वपूर्ण पर्व ठरणार आहे.या संमेलनाचे विशेष आकर्षण म्हणजे विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करून समाजासमोर आदर्श निर्माण करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा विशेष पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक तसेच अन्य क्षेत्रांत योगदान देणाऱ्या महिलांच्या कार्याची दखल घेऊन त्यांच्या कर्तृत्वाला व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा उपक्रम यानिमित्ताने राबविण्यात येणार आहे.

भिस्तबाग चौकातील, लोकमान्य नगर मित्र मंडळाला मनपाचे पारितोषिक

गणेश विसर्जन मिरवणूक शिस्तबद्ध आणि पारंपारिक असल्याने सन्मान



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर महानगरपालिकेच्या सार्वजनिक गणेशोत्सव २०२६ बक्षीस वितरण समारंभात लोकमान्य नगर मित्र मंडळ, भिस्तबाग चौक, सावेडी, अहिल्यानगर या मंडळाला शिस्तबद्ध, पारंपारिक गणेश विसर्जन मिरवणूक चे तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. हे पारितोषिक मंडळाला अहिल्यानगर महानगरपालिकेच्या महापौर सौ. ज्योतीताई गाडे व उपमहापौर श्री. धनंजय जाधव व आयुक्त श्री यशवंतजी डांगे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. महापौर आणि उपमहापौर यांनी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. तसेच प्रभाग क्रमांक ६ मधील चारही नगरसेवक यांनीही मंडळाचे कौतुक करत अभिनंदन केले.

मंडळाने ह्यावर्षी २० फुटी हलता गरुड पक्षी आणि गणराय विराजमान हा देखावा सादर केला होता. ह्यामध्ये हिंदुत्व वाद्यपथक व आकर्षक विद्युत रोषणाई हे मुख्य आकर्षण होते. मंडळाचे यंदाचे २७ वे वर्ष होते. सोना नगर चौक ते यशोदा नगर अशी ही मिरवणूक काढण्यात आली होती. सावेडी मध्ये झालेल्या ह्या गणेश विसर्जन मिरवणूक मध्ये लोकमान्य नगर मित्र मंडळ चे मिरवणूक हे विशेष आकर्षण ठरले.

यासाठी मंडळाचे अध्यक्ष योगेश काळे यांनी महापौर, उपमहापौर, आयुक्त, मनपा कर्मचारी प्रभाग क्रमांक ०६ चे चारही नगरसेवक, दिलीपजी टिपरसे, तोफखाना पोलीस स्टेशन प्रमुख श्री बालाजी वैद्य साहेब व इतर पोलिस कर्मचारी व मंडळाचे देणगीदार परिसरातील नागरिक, कार्यकर्ते यांचे आभार मानले.

प्रभाग ७ मधील बालिकाश्रम रोडवरील पथदिव्यांची वेळ वाढवा

माजी महापौर बाबासाहेब वाकळे व माजी उपमहापौर अनिल बोरुडे यांची आयुक्तांकडे मागणी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ७ मधील बालिकाश्रम रोड ते पंपिंग स्टेशन, पूर्णा हॉटेल ते कराळे जिमपर्यंतच्या रस्त्यावरील पथदिवे सुरू ठेवण्याची वेळ वाढविण्यात यावी, अशी मागणी माजी महापौर बाबासाहेब वाकळे व माजी उपमहापौर अनिल बोरुडे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन दिले आहे.

सध्या हिवाळ्यामुळे सकाळी उशिरा उजाडते, तर सायंकाळी लवकर अंधार पडतो. त्यामुळे या परिसरातील नागरिक, विद्यार्थी आणि कामगारांना अंधारातून प्रवास करावा लागत आहे. पथदिवे लवकर बंद होत असल्याने तसेच सायंकाळी उशिरा सुरू होत असल्याने नागरिकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. अंधाराचा फायदा घेऊन परिसरात किरकोळ चोऱ्यांचे प्रमाणही वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, असे माजी उपमहापौर अनिल बोरुडे यांनी सांगितले.

निवेदनात नमूद केले आहे की, प्रभाग क्रमांक ७ मधील बालिकाश्रम रोडवर न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, रेसिडेन्शियल कॉलेज, अभ्यासिका, व्यावसायिक दुकाने आणि महालक्ष्मी उद्यान आहे. त्यामुळे या रस्त्यावर विद्यार्थी, नागरिक आणि व्यावसायिकांची नेहमीच वर्दळ असते. परिसरातील अनेक नागरिक बालिकाश्रम रोड ते पंपिंग स्टेशन, पूर्णा हॉटेल ते कराळे जिम या मार्गावर पहाटे फिरण्यासाठी जातात. तसेच हा रस्ता शहराच्या मध्यवर्ती भागात असल्याने एमआयडीसीमध्ये काम करणारा कर्मचारी वर्गही या मार्गाचा मोठ्या प्रमाणात वापर करतो.

या परिसरात सीना नदी जवळ असल्याने आजूबाजूच्या भागात शेतीही केली जाते.

केडगाव येथे मोफत नेत्र तपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन

श्री कुंदनलाल तिलकचंद वासन चॅरिटेबल स्ट व आनंदऋषीजी नेत्रालयाचा पुढाकार । शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन; रक्तदान शिबिराचाही समावेश



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– श्री कुंदनलाल तिलकचंद वासन चॅरिटेबल ट्रस्ट व आनंदऋषीजी नेत्रालय यांच्या वतीने गुरुवारी (दि.२६ नोव्हेंबर) रोजी केडगाव एमआयडीसी येथील वासन टोयोटा शोरुम येथे मोफत नेत्र तपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिर व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दृष्टीदोष असलेल्या गरजूंसाठी मागील १९ वर्षांपासून वासन उद्योग समूहाचे चेअरमन विजयजी वासन यांच्या मार्गदर्शनाखाली गरजूंसाठी या शिबिराचे आयोजन केले जात आहे. या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन विजय वासन, तरुण वासन व जनक आहुजा यांनी केले आहे.

आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन होणार आहे. सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत रुग्णांची तपासणी आनंदऋषीजी नेत्रालय हॉस्पिटलचे तज्ञ डॉक्टर मंडळी करणार आहेत. तर मोतीबिंदू असलेल्या रुग्णांना तपासणीनंतर शस्त्रक्रिया केली जाणार आहे. टाक्याचे ऑपरेशन व बिन टाक्याचे (फेको लेसर) ऑपरेशन अल्पदरात केले जाणार आहे. तर शिबीरार्थींना नंबरचे चष्मे कार्यक्रम स्थळी मोफत उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याची माहिती अनिश आहुजा व जालिंदर बोरुडे यांनी दिली.

शिबिरार्थींना येताना रेशन कार्ड, मतदान ओळखपत्र व आधारकार्डची झेरॉक्स आणने आवश्यक आहे. नांव नोंदणीसाठी जालिंदर बोरुडे ९८८१८१०३३३ व वासन टोयोटा ९६०४०३८२३४ यांच्या नंबरवर संपर्क साधण्याचे सांगण्यात आले आहे.

रक्तदान शिबिराचे आयोजन

शहरातील रक्ताचा तुटवडा भरुन काढण्यासाठी श्री कुंदनलाल तिलकचंद वासन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने रक्तदान शिबिराचे देखील आयोजन करण्यात आले आहे. या रक्तदान शिबिरात सहभागी होण्याचे आवाहन स्टच्या वतीने करण्यात आले आहे. रक्तदान शिबिरासाठी जनकल्याण रक्तकेंद्राचे सहकार्य मिळत आहे.

डॉ. रणजित राऊत यांच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद

। दुष्काळ संपेपर्यंत वन्यजीवांसाठी पिण्याचे पाणी उपलब्ध करण्याचा संकल्प । पिंपरखेड येथे पाच पाणवठे व पाणपोई उपक्रमाचा शुभारंभ



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

जामखेड– सध्या दुष्काळ आणि पाणीटंचाईच्या तीव्र झळा सर्वसामान्य नागरिकांसह पशुपक्षी व वन्यजीवांनाही सहन कराव्या लागत आहेत. उन्हाळा आणि पाणीटंचाईच्या काळात नैसर्गिक जलस्रोत आटल्यामुळे वन्यप्राणी, पक्षी तसेच इतर जीवांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी धडपड करावी लागत आहे. या पार्श्वभूमीवर पशुपक्षी व वन्यजीवांसाठी ठिकठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याचे डॉ. रणजित राऊत यांनी केलेले आवाहन पिंपरखेड येथील श्री.विठ्ठल शिक्षण प्रसारक मंडळाने सकारात्मकरीत्या स्वीकारले असून, दुष्काळ संपेपर्यंत वन्यजीवांसाठी पाणी उपलब्ध करून देण्याचा स्तुत्य संकल्प करण्यात आला आहे.

श्री.विठ्ठल शिक्षण प्रसारक मंडळ, पिंपरखेड, तालुका जामखेड, जिल्हा अहिल्यानगर, तसेच श्री विंचरणा विद्यालय, शिक्षक व विद्यार्थ्यांच्या संयुक्त सहकार्याने पिंपरखेड परिसरात वन्यप्राण्यांसाठी एकूण पाच पानवठे व पाणपोई उभारण्यात आल्या आहेत. या उपक्रमाचे उद्घाटन फक्राबादचे सुपुत्र वन्यजीव अभ्यासक, पक्षी निरीक्षक व जैवविविधता संशोधक डॉ.रणजित रावसाहेब राऊत यांच्या हस्ते श्री.विंचरणा विद्यालय, परिसरात करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री.दिगंबर ढवळे यांनी दुष्काळ संपेपर्यंत पशुपक्षी व वन्यप्राण्यांसाठी पिण्याच्या पाण्याचे नियमित नियोजन करण्यात येणार असल्याचे जाहीर केले. गावातील विविध ठिकाणी पानवठे व पाणपोई उभारून मुक्या जीवांना पाणी उपलब्ध करून देण्याचा संस्थेचा प्रयत्न राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ.रणजित राऊत म्हणाले की, ''पक्षी आणि वन्यप्राणी वाचले तरच ही पृथ्वी वाचेल. निसर्गातील प्रत्येक जीवाचे अस्तित्व महत्त्वाचे असून, दुष्काळाच्या काळात पशुपक्ष्यांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे ही प्रत्येकाची सामाजिक व पर्यावरणीय जबाबदारी आहे.'' संस्थेने राबविलेल्या या उपक्रमाचे त्यांनी मनापासून कौतुक केले व आभार व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री.पोपटराव शामराव खोसे, संस्थापक अध्यक्ष, विनोबा भावे ग्रामविकास प्रतिष्ठान, मलठण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रत्येकाने आपल्या घराच्या परिसरात पक्ष्यांसाठी पाणी व धान्याची व्यवस्था करण्याचे आवाहन केले. त्यांच्या आवाहनाला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आजपासूनच घराच्या आजूबाजूला पक्ष्यांसाठी पाण्याची व्यवस्था करण्याचा संकल्प केला.

या कार्यक्रमास सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस उप-निरीक्षक श्री. अरुण शिंदे, श्री.भीमराव शिंदे (सामाजिक कार्यकर्ते), श्री.नवनाथ गायकवाड, श्री.ह.भ.प.दादाहरी खोसे, श्री.भाऊसाहेब झिंजाडे, श्री.फकीरभाई शेख, पत्रकार श्री.पोपट गायकवाड यांच्यासह श्री.विंचरणा विद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.वेल्हाळ सर यांनी केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.खताळ सर यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले, तर श्री.मुजावर सर यांनी आभार मानले. डॉ.रणजित राऊत यांच्या वन्यजीव व पक्ष्यांसाठी पाणी उपलब्ध करून देण्याच्या आवाहनाला मिळालेला हा सकारात्मक प्रतिसाद ग्रामीण भागात पर्यावरण संवर्धनाची लोकचळवळ उभी राहण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरत असून, दुष्काळात मुक्या जीवांना आधार देणारा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

हृदय उजव्या बाजूला; झडप बदलताना डॉक्टरांसमोर अनोखे आव्हान

डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटलमध्ये ६० वर्षीय रुग्णावर गुंतागुंतीची शस्त्रक्रिया; विभागाकडून आतापर्यंत २,३३३ प्रमुख हृदयशस्त्रक्रिया

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– जन्मतःच हृदय छातीच्या उजव्या बाजूला आणि त्यात भर म्हणून हृदयाच्या महत्त्वाच्या झडपेत गंभीर बिघाड! अशा दुर्मीळ परिस्थितीमुळे ६० वर्षीय रुग्णाच्या उपचारात डॉक्टरांसमोर वेगळेच आव्हान उभे राहिले होते. मात्र, हृदयाच्या असामान्य रचनेचा बारकाईने अभ्यास करून डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल, अहिल्यानगर येथील हृदयशल्यचिकित्सा विभागाने या रुग्णाची मायट्रल झडप बदलण्याची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडली.

काही महिन्यांपासून रुग्णाला श्वास घेण्यास त्रास, सतत थकवा आणि खोकला जाणवत होता. तपासणीत हृदयाच्या मायट्रल झडपेचा गंभीर विकार असल्याचे आढळले. विशेष म्हणजे, रुग्णाला जन्मजात डेक्स्ट्रोकार्डिया () ही अवस्था असून त्याचे हृदय छातीच्या नेहमीच्या डाव्या बाजूऐवजी उजव्या बाजूला आहे. त्यामुळे शस्त्रक्रियेच्या नियोजनात हृदयाची दिशा, अंतर्गत रचना आणि रक्तवाहिन्यांची स्थिती यांचा विशेष विचार करावा लागला. हृदय शस्त्रक्रिया तज्ञ डॉ. विनोद चिंदे यांच्या नेतृत्वाखाली विकारग्रस्त मायट्रल झडप काढून तिच्या जागी कृत्रिम झडप बसविण्यात आली. या शस्त्रक्रियेत भूलतज्ज्ञ डॉ. राहुल मामडे, तसेच डॉ. हर्षल वाळुंज आणि डॉ. केदार देशमुख यांचा सहभाग होता. शस्त्रक्रियेनंतर रुग्णांच्या प्रकृतीची सुधारणा होऊन रुग्ण ठणठणीत बरा होऊन त्यास डिस्चार्ज देण्यात आला.



या वैशिष्ट्यपूर्ण शस्त्रक्रियेबरोबरच रुग्णालयाच्या कार्डिओव्हॅस्क्युलर अँड थोरॅसिक सर्जरी () विभागाने गेल्या दशकभरात विविध गुंतागुंतीच्या हृदयविकारांवरील उपचारात महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. २०१६ ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत विभागात २,३३३ प्रमुख हृदयशस्त्रक्रिया आणि डायलिसिस रुग्णांसाठी २,१६३ एव्ही फिस्टुला प्रक्रिया करण्यात आल्या आहेत. विभागात हृदयाच्या रक्तवाहिन्यांमधील अडथळ्यांवर बायपास शस्त्रक्रिया (), हृदयाच्या झडपा बदलणे व दुरुस्त करणे, जन्मजात हृदयदोषांवरील / शस्त्रक्रिया, रक्तवाहिन्यांच्या फुगवट्यावरील शस्त्रक्रिया तसेच डायलिसिससाठी आवश्यक रक्तवाहिन्यांचा मार्ग तयार करण्याच्या सुविधा उपलब्ध आहेत. या विविध शस्त्रक्रियांचा अनुभव, विशेष उपचारांचे नियोजन आणि संबंधित वैद्यकीय शाखांमधील समन्वय यामुळे गुंतागुंतीच्या रुग्णांवर उपचार करणे शक्य होत आहे.

हृदयशस्त्रक्रियेबरोबरच विविध गंभीर आजारांवरील उपचार गरजू रुग्णांपर्यंत पोहोचविण्यातही रुग्णालयाने उल्लेखनीय कामगिरी नोंदविली आहे. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना () आणि आयुष्मान भारतप्रधानमंत्री जन आरोग्य योजना (-) यांसारख्या शासकीय आरोग्य योजनांतर्गत २०१४ ते जुलै २०२६ या कालावधीत रुग्णालयाच्या नोंदीनुसार एकूण १,४३,९९३ लाभार्थ्यांना उपचारांचा लाभ मिळाला आहे. विशेष म्हणजे, २०१४ मध्ये १५३ असलेली वार्षिक लाभार्थी संख्या २०२५ मध्ये २०,६०१ पर्यंत पोहोचली. शासकीय आरोग्य योजनांच्या अंमलबजावणीतील उल्लेखनीय कामगिरीबद्दल रुग्णालयाला २०१८ पासून दरवर्षी जिल्हाधिकारी कार्यालय आणि राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या वतीने प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले आहे.

रुग्णालयाची आरोग्यसेवा केवळ अहिल्यानगर जिल्ह्यापुरती मर्यादित राहिलेली नाही. रुग्णालयाच्या माहितीनुसार, महाराष्ट्रातील १६ जिल्ह्यांतून रुग्ण विविध उपचारांसाठी येथे येतात. हृदयविकार, कर्करोग आणि इतर गंभीर आजारांवरील विशेष उपचारांसाठी रुग्णालयाची निवड केली जात असल्याने ग्रामीण आणि निमशहरी भागांतील रुग्णांनाही विशेष वैद्यकीय सेवांचा लाभ मिळत आहे. जन्मतःच हृदयाची रचना वेगळी असलेल्या रुग्णावर करण्यात आलेली ही शस्त्रक्रिया म्हणजे केवळ एका रुग्णाच्या उपचाराची यशोगाथा नाही, तर गुंतागुंतीच्या आजारांमध्ये अचूक निदान, अनुभवाधारित शस्त्रक्रिया आणि योग्य वैद्यकीय नियोजन किती महत्त्वाचे ठरते, याचे उदाहरण आहे. माननीय नामदार डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, अध्यक्ष, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशन यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील यांच्या पुढाकाराने रुग्णालयातील आधुनिक वैद्यकीय सुविधांच्या विकासावर सातत्याने भर दिला जात आहे. तसेच सुपर स्पेशालिटी विभागांच्या माध्यमातून रुग्णांना अत्याधुनिक, गुणवत्तापूर्ण आणि तज्ज्ञांच्या देखरेखीखाली उपचार उपलब्ध करून देण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत

शिक्षक झाले बालमित्र; बालदिनाचा सोहळा रंगला उत्साहात!



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– बालपण म्हणजे निरागस हास्य, निरागस स्वप्ने आणि आनंदाचा अविरत झरा! बालदिनाचे औचित्य साधून सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध मनोरंजक व आनंददायी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांसाठी घेतलेल्या विशेष उपक्रमांमुळे संपूर्ण शाळा आनंदाने आणि उत्साहाने बहरून गेली.

चिमुकल्या हास्यात आनंद फुलतो, बालपणातच सुंदर विश्व खुलते,

स्वप्नांना मिळते नवे आकाश, बालदिन देतो आनंदाचा सहवास!

कार्यक्रमाची सुरुवात संगीत शिक्षक श्री. बाळासाहेब पठारे यांनी सादर केलेल्या सुंदर बालगीताने झाली. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा यांनी लकडी की काठी हे लोकप्रिय बालगीत सादर करून विद्यार्थ्यांच्या आनंदात भर घातली.

या कार्यक्रमाचे खास आकर्षण म्हणजे शिक्षकांनी मुलांच्या वेशभूषेत केलेले बहारदार सादरीकरण! शिक्षकांनी विविध बालगीतांवर नृत्य, अभिनय आणि मनोरंजक सादरीकरण करून विद्यार्थ्यांचे भरभरून मनोरंजन केले. आपल्या शिक्षकांचे हे अनोखे रूप पाहून विद्यार्थीही आनंदाने भारावून गेले. या आनंदोत्सवाला माध्यमिकच्या प्राचार्य गीता तांबे आणि माध्यमिक विभागातील सर्व शिक्षकांची विशेष उपस्थिती लाभली.

बालदिनाचा आनंद द्विगुणित करण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी खास खाद्यपदार्थांची मेजवानी आयोजित करण्यात आली होती. शाळेच्या परिसरात विविध खाद्यपदार्थांचे आकर्षक स्टॉल्स उभारण्यात आले होते. बर्गर, भेळ, पेस्ट्री, नूडल्स अशा विविध चविष्ट पदार्थांचा विद्यार्थ्यांनी मनसोक्त आस्वाद घेतला.

या संपूर्ण कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष श्री. राम मेंघानी, उपाध्यक्ष श्री. रूपचंद मोटवानी, सचिव श्री. गोपाल भागवानी, खजिनदार श्री. दामोधर माखिजा तसेच संस्थेचे विश्वस्त श्री. महेश मध्यान, श्री. सुरेश हिरानंदानी, श्री. राजकुमार गुरुनानी आणि श्री. हरेष मध्यान यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विशेष परिश्रम घेतले.

विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद, उत्साह आणि हास्याने संपूर्ण शाळा आनंदमय झाली. अशा आनंददायी उपक्रमातून विद्यार्थ्यांना बालपणाचा मनमुराद आनंद देत सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये बालदिनाचा सोहळा उत्साहात आणि अविस्मरणीय वातावरणात संपन्न झाला.

जन्म-मृत्यू दाखल्यांसाठी टोल फ्री क्रमांक देणार

आरोग्य समिती अध्यक्ष डॉ. सागर बोरुडे व उपाध्यक्ष दत्ता गाडळकर यांच्याकडून विभागाची पाहणी

जन्म, मृत्यू व नावात बदलासाठी आवश्यक कागदपत्रांची यादी दर्शनी भागात लावण्याच्या सूचना



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर महानगरपालिकेचा जन्म-मृत्यू दाखले विभाग हा नागरिकांच्या दैनंदिन कामकाजाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा विभाग आहे. नागरिकांना जन्म, मृत्यू तसेच नावात बदल करून घेण्यासाठी आवश्यक दाखले वेळेत उपलब्ध व्हावेत, यासाठी विभागातील कामकाजात सुसूत्रता आणणे गरजेचे आहे. नागरिकांना दाखल्यांसाठी वारंवार कार्यालयात हेलपाटे मारावे लागू नयेत, यासाठी विभागाला टोल फ्री दूरध्वनी क्रमांक उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच जन्म, मृत्यू आणि नावात बदल करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची यादी दर्शनी भागात फलकावर लावण्यात यावी, अशा सूचना मनपा आरोग्य समितीचे अध्यक्ष नगरसेवक डॉ. सागर बोरुडे यांनी दिल्या.

महानगरपालिकेच्या जन्म-मृत्यू दाखले विभागाची आरोग्य समितीचे अध्यक्ष नगरसेवक डॉ. सागर बोरुडे आणि उपाध्यक्ष नगरसेवक दत्ता गाडळकर यांनी पाहणी केली. यावेळी त्यांनी विभागातील कर्मचाऱ्यांशी चर्चा करून त्यांच्या अडचणी आणि कामकाजातील समस्या जाणून घेतल्या.

यावेळी डॉ. बोरुडे म्हणाले की, जन्म-मृत्यू विभागात नागरिक जन्माचे दाखले, मृत्यूचे दाखले तसेच नावात बदल करून घेण्यासाठी येत असतात. मात्र, काही तांत्रिक किंवा प्रशासकीय अडचणींमुळे दाखले मिळण्यास विलंब झाल्यास नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली जाते. त्यामुळे नागरिकांच्या समस्या समजून घेण्याबरोबरच विभागातील कर्मचाऱ्यांच्या अडचणी जाणून घेणेही आवश्यक आहे. पाहणीदरम्यान कर्मचाऱ्यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले असून, त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी महानगरपालिकेच्या माध्यमातून आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल.

विभागाला टोल फ्री दूरध्वनी क्रमांक उपलब्ध करून दिल्यानंतर नागरिकांनी दाखल्यांच्या प्रक्रियेबाबत या क्रमांकावर संपर्क साधून माहिती घ्यावी. त्यामुळे नागरिकांना वारंवार कार्यालयात येण्याची गरज भासणार नाही. तसेच जन्म, मृत्यू आणि नावात बदल करण्यासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची संपूर्ण यादी दर्शनी भागात फलकावर लावण्यात यावी. नागरिकांना ही माहिती सहज वाचता येईल आणि त्यानुसार आवश्यक कागदपत्रांसह अर्ज भरता येईल. परिणामी अर्जातील त्रुटी कमी होऊन कार्यालयातील गर्दीवर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल.

कर्मचारी आणि नागरिक यांच्यात योग्य समन्वय राहिल्यास कामकाज अधिक सुलभ होईल. नियोजनबद्ध कामकाजातून विभागात सुसूत्रता निर्माण होऊन नागरिकांना वेळेत सेवा देता येईल, असा विश्वास डॉ. सागर बोरुडे यांनी व्यक्त केला.

उद्योग व्यवसाय वाढीसाठी सेंट्रल बँक ऑफ इंडिया उद्योजकांच्या पाठीशी– नरेशकुमार दुबे

उद्योजकांना २० कोटी रुपयांचे कर्जाचे वितरण



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– क्रेडिटआउटरीच कार्यक्रमाच्या माध्यमातून एमएसएमई कर्जदार उद्योजक आणि भागीदारांशी संवाद साधणे तसेच एमएसएमई योजनांची माहिती देणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. प्रत्येक तीन महिन्यातून एकदा उद्योग व्यवसाय वाढीसाठी कॅम्पचे बँकेच्या माध्यमातून आयोजन केले जाते. सेंट्रल बँक ऑफ इंडिया ११५ वर्षांहून अधिक जुनी असून १९११ मध्ये सर सोराबजी पोचखानवाला यांनी स्थापना केली.भारतीयांना पदोन्नती मिळत नसल्याचे कारण देत त्यांनी विदेशी बँकेतून बाहेर पडून स्वतंत्र बँक सुरू केली. बँकेत सुमारे ३८,००० कर्मचारी कार्यरत असून, देशभरात ४,००० हून अधिक शाखा तसेच एटीएम चे नेटवर्क आहे. बँक आणि उद्योजकांनी हातात हात मिळून काम करावे. उद्योजक व नवउद्योजकांच्या चालना देण्यासाठी बँकेच्या कर्जरूपी विविध योजना आहेत त्याचा फायदा घेऊन आपले व्यवसाय वाढवावेत क्रेडिट आउटरीच कार्यक्रमाच्या माध्यमातून नवोद्योजकांना व उद्योजकांना व्यवसाय वाढीसाठी उत्तम संधी आहे उद्योग व्यवसाय वाढीसाठी सेंट्रल बँक ऑफ इंडिया उद्योजकांच्या पाठीशी सदैव उभी आहे आज या कॅम्पच्या माध्यमातून २० कोटी रुपयांचे कर्जाचे वितरण करून मंजुरी देण्यात आली असल्याचे दुबे यांनी सांगितले.

सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वतीने अहिल्यानगर क्षेत्रात एमएसएमआय नॅशनलवाईड क्रेडिट आऊट्रीच अभियान २०२६अंतर्गत विशेष कर्ज आऊट्रीच कार्यक्रमाचे एमआयडीसी येथे आयोजित कार्यक्रमात उद्योजकांना मार्गदर्शन करताना दुबे बोलत होते याप्रसंगी आमी चे सचिव सचिन पाठक ,जिल्हा उद्योग केंद्राचे खलील शेख उद्योजक संभाजी गाडे सीए आकाश राठोड आदींसह उद्योजक व नव उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना दुबे म्हणाले की प्रत्येक व्यक्तीला आपला सिबिल स्कोर माहिती असणे आवश्यक आहे त्यासाठी बँकेत जाण्याऐवजी किंवा थर्ड-पार्टी/ॲग्रिगेटर ॲप्सवर अवलंबून राहण्याऐवजी, नाममात्र शुल्क भरून . वर स्वतः चा सिबिल स्कोअर आणि संपूर्ण रिपोर्ट तपासावा. प्रत्येक ग्राहकाने

री-केवायसी नियमित करावी.

आममी चे सचिव सचिन पाठक म्हणाले की बँकिंग क्षेत्र आणि उद्योग क्षेत्र यांनी हातात हात घालून एकत्रितपणे पुढे पाऊल टाकल्यास निश्चितच देशाच्या प्रगतीला गती मिळेल. सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या माध्यमातून अहिल्यानगर मधील उद्योजकांना चालना मिळत आहे. या माध्यमातून सकारात्मक गोष्टी निदर्शनास येत असून, आर्थिक व औद्योगिक विकासासाठी बँका आणि उद्योगांचा समन्वय अत्यंत महत्त्वाचा ठरत असल्याचे ते म्हणाले.

यावेळी जिल्हा उद्योग केंद्राचे खलील शेख यांनी उद्योजकांसाठी जिल्हा उद्योग केंद्र मध्ये असलेल्या विविध योजनांची माहिती दिली प्रमोद दहिफळे यांनी एमएसएमई योजनेची उद्योजकांना पीपीटी द्वारे सविस्तर माहिती दिली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुचेता मानकर यांनी केले तर आभार सुनील विधाते यांनी मानले. यावेळी उद्योजकांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते कर्जाचे वितरण व मंजुरी पत्र देण्यात आले.

मढी येथे रविवारी जिल्हास्तरीय क्रॉस कंट्री अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशन, अहिल्यानगर आणि शिवछत्रपती करिअर अकॅडमी पाथर्डी (भरती पूर्व प्रशिक्षण केंद्र) यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय क्रॉस कंट्री अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा रविवार, दिनांक ६ डिसेंबर २०२६ रोजी सकाळी ८:३० वाजता श्री क्षेत्र मढी येथे (मढी-पाथर्डी रोड) पार पडणार आहे. या स्पर्धेतून आगामी राज्य क्रॉस कंट्री स्पर्धेसाठी अहिल्यानगर जिल्ह्याचा संघ निवडण्यात येणार आहे.

पुढील राज्यस्तरीय क्रॉस कंट्री स्पर्धा दिनांक २५ व २६ डिसेंबर २०२६ रोजी उमरगा (जि. धाराशिव) येथे होणार आहे. जिल्हास्तरीय स्पर्धेतील प्रत्येक गटातील प्रथम तीन क्रमांकाच्या विजेत्यांना गुणवत्ता प्रमाणपत्र व मेडल देऊन गौरविण्यात येणार आहे. ही स्पर्धा केवळ अहिल्यानगर जिल्ह्यातील खेळाडूंसाठीच मर्यादित असून १४ वर्षांखालील खेळाडूंना यात सहभागी होता येणार नाही. खेळाडूंची नाव नोंदणी स्पर्धेच्या ठिकाणी सकाळी ८:०० वाजता केली जाणार आहे.

सर्व खेळाडूंनी आपला मूळ (ओरिजनल) जन्म दाखला व आधार कार्ड सोबत आणणे बंधनकारक आहे. तसेच, राज्य स्पर्धेत खेळण्यासाठी प्रत्येक खेळाडूने आपला ' नंबर' काढणे आवश्यक आहे. स्पर्धेसंदर्भात काही तक्रार असल्यास इव्हेंट संपल्यानंतर एक तासाच्या आत योग्य त्या पुराव्यासह स्पर्धा आयोजकांकडे अर्ज करावा, त्यावर आयोजन समिती अंतिम निर्णय देईल.

जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी या स्पर्धेत आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन अहिल्यानगर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनचे अध्यक्ष सुनील जाधव व उपाध्यक्ष राजेंद्र कोतकर यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी दिनेश भालेराव, रमेश वाघमारे (९२७१२३३६६२), राहुल काळे (९९७५३२०८३७), श्रीरामसेतु आवारी (९३२२०१५०४६), किशोर मरकड (९६५७१८९९२४) किंवा जगन गवांदे (९८८१३२८१८६) यांच्याशी संपर्क साधावा.

स्पर्धेचे गट व अंतर खालीलप्रमाणे :

पुरुष व मुले: खुला गट १० कि.मी., २० वर्षांखालील मुले ८ कि.मी., १८ वर्षांखालील मुले ६ कि.मी., १६ वर्षांखालील मुले २ कि.मी.

महिला व मुली: खुला गट १० कि.मी., २० वर्षांखालील मुली ६ कि.मी., १८ वर्षांखालील मुली ४ कि.मी., १६ वर्षांखालील मुली २ कि.मी.

(पान १ वरून)

पाणी बचत, स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा - आयुक्त यशवंत डांग

काम सुरू केले आहे. ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. अहिल्यानगर शहरातील गणेश मंडळांनी यंदाच्या गणेशोत्सवात सुंदर देखावे सादर करून समाजप्रबोधनाचे काम केले आहे. त्यांच्या या कार्याचे कौतुक करून महानगरपालिकेच्या माध्यमातून त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यात आली असल्याचे महापौर ज्योतीताई गाडे यांनी नमूद केले. आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, गणेशोत्सवामध्ये शहरातील मंडळांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन उत्कृष्ट देखावे सादर केले आणि समाजप्रबोधनाचे काम केले. यापुढील काळातही असेच सामाजिक कार्य सर्वांनी मिळून करणे आवश्यक आहे. पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पाणी बचतीचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्याची गरज आहे. पुढील काळात वेळेवर पाऊस पडेल की नाही, हे सांगता येत नाही. त्यामुळे आतापासूनच पाणी बचतीची काळजी घ्यावी लागणार आहे. आपण ४० किलोमीटर अंतरावरून पाणी आणतो. पाणी ही दुर्मिळ गोष्ट असून एप्रिल आणि मे महिन्यात पाणीटंचाईची तीव्रता जाणवू शकते. त्यामुळे नागरिकांनी आतापासूनच पाण्याचा काटकसरीने वापर करावा. शहरातील स्वच्छतेवर महानगरपालिकेच्या माध्यमातून सुमारे दहा कोटी रुपये खर्च केले जातात. नागरिकांनीही आपला परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी स्वीकारावी आणि घरातील कचरा घंटागाडीतच टाकावा. त्यामुळे आपले शहर स्वच्छ आणि सुंदर राहण्यास मदत होईल. शहरात २७ दवाखान्यांच्या माध्यमातून नागरिकांना आरोग्यसेवा दिली जाते. या दवाखान्यांमध्ये मोफत रक्ततपासणी केली जाते, तसेच औषधेही मोफत उपलब्ध करून दिली जातात. त्यामुळे गरजू नागरिकांनी या आरोग्यसेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

समाजप्रबोधनपर देखावे विभागात प्रथम क्रमांक बालाजी युवक मंडळ, मंगल गेट यांच्या 'बदलाची सुरुवात आपल्यापासून' या देखाव्याला मिळाला. द्वितीय क्रमांक विभागून वीर राजे मित्र मंडळ, सुगंधी चाळ यांच्या 'बेटी बचाव' आणि श्री कपिलेश्वर मित्र मंडळ ट्रस्ट यांच्या 'मिशन भेसळमुक्त भारत' या देखाव्यांना मिळाला. तृतीय क्रमांक विभागून स्वामी विवेकानंद तरुण मंडळ, स्नेहालय यांच्या 'उडान रस्ता बदलायला हवा, बालविवाह थांबवा, बालपण वाचवा' आणि नवग्रह प्रतिष्ठान मित्र मंडळ, नेप्ती नाका यांच्या 'महाराष्ट्र निर्मितीचे तीन आधारस्तंभ' या देखाव्यांना मिळाला. ऐतिहासिक व गडकिल्ले देखावे विभागात प्रथम क्रमांक शिवरद प्रतिष्ठान, पटवर्धन चौक यांच्या 'शिवराज्याभिषेक' या देखाव्याला मिळाला. द्वितीय क्रमांक सिद्धेश्वर मित्र मंडळ, जगु भाई तालीम यांच्या 'बाजीप्रभू देशपांडे, वीर शिवा काशीद' या देखाव्याला, तर तृतीय क्रमांक नंदनवन मित्र मंडळ यांच्या 'युगत मांडली' या देखाव्याला मिळाला. सोशल मीडिया व आधुनिक तंत्रज्ञान देखावे स्पर्धेत प्रथम क्रमांक जय हिंद तरुण मंडळ, दवा बाजार, नांगरे गल्ली यांच्या 'दशावतार' या देखाव्याला मिळाला. द्वितीय क्रमांक बागडपट्टीचा राजा मित्र मंडळ यांच्या 'सृष्टीची उत्पत्ती आणि विनाश' या देखाव्याला, तर तृतीय क्रमांक शिवगर्जना प्रतिष्ठान यांच्या 'गुप्तहेरगिरी ही स्वराज्याची ढाल' या देखाव्याला मिळाला. प्रबोधनपर, शिस्तबद्ध व पारंपरिक पद्धतीने मिरवणूक काढणाऱ्या मंडळांच्या विभागात प्रथम क्रमांक ग्रामदैवत श्री विशाल गणपती, माळीवाडा यांना मिळाला. द्वितीय क्रमांक विभागून तालयोगी, सावेडी आणि मोरया युवा प्रतिष्ठान, गुलमोहर रोड यांना मिळाला. तृतीय क्रमांक विभागून गोरक्षनाथ युवा प्रतिष्ठान, वैदुवाडी, सावेडी आणि लोकमान्य नगर मित्र मंडळ, भिस्तबाग चौक यांना मिळाला. उत्कृष्ट रांगोळी स्पर्धेत रंग संस्कृती ग्रुप, अहिल्यानगर आणि सम्राट तरुण मंडळ, चितळे रोड यांचा गौरव करण्यात आला. धार्मिक व आध्यात्मिक देखावे स्पर्धेत विशेष उत्तेजनार्थ पारितोषिकासाठी शेरकर गल्ली मित्र मंडळाच्या वतीने सादर करण्यात आलेले 'बारा ज्योतिर्लिंग दर्शन' आणि सिद्धिविनायक मित्र मंडळाच्या वतीने सादर करण्यात आलेला 'तिरंगा चौक, फणसे मळा, सावेडी - कर्दळीवन' या देखाव्यांची निवड करण्यात आली. स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या विजेत्यांना २५ हजार रुपये रोख आणि सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांकाच्या विजेत्यांना १५ हजार रुपये रोख आणि सन्मानचिन्ह, तर तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना १० हजार रुपये रोख आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमास महापौर ज्योतीताई गाडे आयुक्त यशवंत डांगे उपमहापौर एडवोकेट धनंजय जाधव ब्रिगेडियर राजीव चावला, सभापती दीपालीताई बारस्कर, अमोल गाडे, नगरसेवक विकी जगताप, प्रकाश भागानगरे, मोहित पंजाबी, नगरसेविका आशाताई डागवले, उपायुक्त मेहर लहारे, उपायुक्त निखिल फराटे, सहाय्यक आयुक्त हरीकल्याण येलगट्टे, परीक्षक श्रेणिक शिंगवी, शशिकांत नजन, अभिजित दरेकर, आर्किटेक्ट अजय अपूर्वा, लहू दळवी आदींसह शहरातील विविध गणेश मंडळांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभासद आणि गणेशभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रुपेश पसपुल यांनी केले, तर आभार प्रदर्शन उपायुक्त मेहर लहारे यांनी केले.

रोजगाराच्या संधी निर्माण करा - डॉ. सुजय विखे

पडावे, अशी मानसिकता बदलण्याची गरज आहे. कुटुंबाच्या प्रगतीसाठी दोघांनीही एकत्रितपणे प्रयत्न केले, तरच तालुक्याचे भविष्य उज्ज्वल होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. राज्य शासनाच्या योजनांचा उल्लेख करताना डॉ. विखे पाटील यांनी मोफत वीज, लाडकी बहीण योजना, दुष्काळी मदत आणि जलसिंचनाच्या कामांचा संदर्भ दिला. राज्यात दुष्काळ जाहीर झाल्यानंतर राहाता तालुक्याचाही त्यामध्ये समावेश करण्यात आला.

दिवाळीपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून पाच हजार रुपयांची मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात आली. याशिवाय निळवंडे धरणाचे पाणी परिसरात आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात आले.महाराष्ट्रातील इतर भागांत दुष्काळाची परिस्थिती असली, तरी राहाता तालुक्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी संकल्प केला आणि त्यादृष्टीने काम केले. पाणी, वीज रोजगाराच्या प्रश्नांवर सरकारने केलेल्या कामांचा लाभ जनतेने घेतला पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

जात-पात बाजूला ठेवून विकासाच्या मुद्द्यावर एकत्र या तसेच समाजातील जातीय आणि धार्मिक भेदांवर भाष्य करताना डॉ. विखे पाटील यांनी अत्यंत स्पष्ट भूमिका मांडली. दुष्काळ पडतो तेव्हा तो कोणत्याही एका जातीसाठी पडत नाही. समाजातील नागरिक असोत, पाण्याची गरज सर्वांनाच असते. निसर्गाला जात माहीत नसते. त्यामुळे समाजाच्या विकासाचा विचार करताना जात आणि धर्मापेक्षा कौशल्य, गुणवत्ता आणि कर्तृत्वाला महत्त्व मिळाले पाहिजे. राजकीय मतभेद असू शकतात; मात्र सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर सर्वांनी एकत्र आले पाहिजे. भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना किंवा अन्य कोणत्याही पक्षाचा कार्यकर्ता असला, तरी दुष्काळ आणि सामान्य माणसाच्या अडचणी सर्वांसाठी सारख्याच आहेत. राजकारण कुठपर्यंत करायचे आणि जनहिताच्या प्रश्नांवर कुठे थांबायचे, हे समजून घेण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. श्रीमंतांनी स्वस्त धान्याचा लाभ सोडून गरिबांना संधी द्यावी स्वस्त धान्य वितरण व्यवस्थेतील गैरप्रकारांवरही त्यांनी लक्ष वेधत आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या आणि चारचाकी वाहने, बंगले असलेल्या कुटुंबांकडूनही स्वस्त धान्याचा लाभ घेतला जात असल्याचे त्यांनी सांगितले. याउलट दुसरीकडे झोपडपट्टीत आणि पत्र्याच्या घरात राहणाऱ्या गरजू कुटुंबांना पुरेसे धान्य मिळत नाही, ही गंभीर बाब असून ज्यांना आर्थिकदृष्ट्या धान्य खरेदी करणे शक्य आहे, अशा कुटुंबांनी स्वतःहून स्वस्त धान्य योजनेचा लाभ सोडून तो खऱ्या गरजूंपर्यंत पोहोचविण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. आपण स्वतः अशा प्रकारे जनतेच्या प्रश्नांवर काम करून दाखवावे लागते. गावातील राजकीय वाद आणि मतभेद बाजूला ठेवून गरिबांना घरकुल मिळावे, यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत. गावातील एकही गरीब कुटुंब घरापासून वंचित राहू नये, यासाठी पुढील वर्षभरात नियोजन करण्याचे आवाहनही त्यांनी केले. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून पुणतांबा गावात अत्याधुनिक शॉपिंग कॉम्प्लेक्स तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या साठी निधी मंजूर झाला असून या जागेची पाहणी ग्रामस्थांच्या उपस्थिती डॉ विखे यांनी केली.. यावेळी पुणतांबा भाजपा महायुतीचे पदाधिकारी तसेच गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

कचरा संकलनासाठी मनपाच्या ताफ्यात आणखी दहा घंटागाड्या दाखल

आमदार जगताप म्हणाले की, शहरातील स्वच्छता टिकवून ठेवण्यासाठी कचरा संकलन व्यवस्था प्रभावी असणे आवश्यक आहे. मोठ्या क्षमतेच्या घंटागाड्या उपलब्ध झाल्यामुळे एकाच वेळी जास्त कचरा उचलता येईल. परिणामी कचरा संकलनाचे काम अधिक जलद गतीने होऊन संपूर्ण व्यवस्थेत सुसूत्रता निर्माण होईल. नागरिकांना नियमित आणि प्रभावी सेवा देण्यासही यामुळे मदत होणार आहे.शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्याची जबाबदारी प्रशासनासोबतच नागरिकांचीही आहे. त्यामुळे नागरिकांनी आपल्या घरातील ओला आणि सुका कचरा वेगवेगळा ठेवून तो घंटागाडीत उपलब्ध असलेल्या स्वतंत्र कप्प्यांमध्येच टाकावा. कचऱ्याचे योग्य वर्गीकरण केल्यास त्याचे व्यवस्थापन करणे सोपे होईल. शहराच्या स्वच्छतेसाठी नागरिकांनी महानगरपालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन आमदार संग्राम जगताप यांनी केले. यावेळी नवीन घंटागाड्यांची पाहणी करताना आमदार संग्राम जगताप स्थायी समितीचे माजी सभापती अविनाश घुले माजी नगरसेवक विपुल शेटीया गोरख पडोळे वृषभ भंडारी आदी उपस्थित होते

जनतेच्या विश्वासाची विकासकामांतून परतफेड करणार - आमदार दाते

फेडण्यासाठी सातत्याने काम करत जनतेला न्याय देण्याचा प्रयत्न आपण करत आहोत. विधानसभा निवडणुकीत अनेक गावांतील प्रमुख कार्यकर्ते विरोधात असतानाही चार दशकांच्या सामाजिक संबंधांमुळे सर्वसामान्य जनतेने अत्यंत चुरशीच्या लढतीत आपल्याला भरभरून साथ दिली. या विश्वासाची परतफेड समाजहिताची विकासकामे करून करण्याचा आपला सातत्याने प्रयत्न असेल. या भूमिपूजन सोहळ्यास तालुकाध्यक्ष वसंतराव चेडे, माजी जिल्हा बँक संचालक प्रशांत दादा गायकवाड, बाबासाहेब खिलारी, संदीप रोहोकले, सुभाष दुधाडे, पोपटराव चौधरी, डॉ. नितीन रांधवण, प्रकाश रोहोकले, देवीदास फलके, प्रवीण फलके, अशोक कावरे, सुभाष गांधी, मिठु जाधव, भास्कर शिंदे, विकास रोकडे, अमोल रोकडे, गणेश शिंदे, गणेश हाके, सुभाष राठोड, संतोष जाधव, आप्पा शिंदे, नंदु साळवे, बाबासाहेब गागरे, छबु शिंदे, अंबरनाथ वाळुंज, इंद्रभान ढोकळे, प्रसाद कर्नावट, दिपक भागवत, गुलाब केसकर, विश्वनाथ शिंदे, राहुल सुडके, संपत जाधव यांच्यासह ग्रामस्थ आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सरस्वती विद्यालयात 'डेंग्यूमुक्त अहिल्यानगर' अभियानाचा १४ वा आठवडा उत्साहात साजरा

भाषणात डेंग्यू आजाराची कारणे आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांची माहिती दिली. घराच्या परिसरात पाणी साचू न देणे, पाण्याची भांडी व टाक्या नियमित स्वच्छ ठेवणे, आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळणे या गोष्टी प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात अंगीकारणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी केवळ स्वतःपुरती काळजी न घेता आपल्या कुटुंबात आणि परिसरातही डेंग्यू प्रतिबंधाबाबत जनजागृती करावी, असे आवाहन त्यांनी केले.नगरसेवक मनोज कोतकर यांनी आपल्या भाषणात प्रभाग क्रमांक १७ मध्ये स्वच्छता आणि आरोग्यविषयक उपक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याचे आवाहन केले.

नगरसेविका अश्विनीताई सुमित लोंढे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर, केडगावचे वैद्यकीय अधिकारी डॉ. गिरीश दळवी, विद्यालयाचे मुख्याध्यापक संदीप भोर, डॉ. परमेश्वर काळे, प्रभाग अधिकारी सुखदेव गुंड, स्वच्छता निरीक्षक राजेंद्र सामल, भारतीय किसान संघाचे जिल्हा मंत्री निलेश चिपाडे, सामाजिक कार्यकर्ते वैभव कदम पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.